दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २६९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२४ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पेणच्या दोन वाहतूक पोलिसांची म्हसळा येथे तडकाफडकी बदली

## बस चालकांकडून १०० रुपये घेऊनही ५०० रुपयाचे ऑनलाईन चलन

**दै.रायगड नगरी । पेण**

काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेनेच्या महाविकास आघाडीच्या महाराष्ट्र सरकार मध्ये हप्तेखोर १०० कोटींचे वाझे प्रकरण गाजत असताना रायगड जिल्ह्यात अनेक ठिकाणी वाहतूक पोलिसांच्या हफ्ते–गीरीची चर्चा सुरु आहे. मुंबई–गोवा माहामार्गावरील पेण तालुक्यातील रामवाडी येथील पोलिस चौकीत परवाच्या रात्रीच्या वेळी असणारे वाहतूक पोलिस मिलिंद पाटील आणि पांडू पाटील यांनी बस चालकांकडून १०० ची लाच घेऊनही पुन्हा मागून ५०० रुपयेचे ऑनलाइन चलन फाडल्याने झालेल्या वादाचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने या दोन्ही वा–हतूक पोलीसांची म्हसळा येथे तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. दिवसभर बंद असलेल्या या पोलीस चौकीत मात्र रात्रीस खेळ चाले हे सुरूच असते.

सविस्तर घटना अशी की, मुंबई–गोवा माहामार्गावरील पेण तालुक्यातील रामवाडी येथील पोलिस चौकीत परवाच्या रात्रीच्या वेळी असण–ारे वाहतूक पोलिस मिलिंद पाटील आणि पांडू पाटील यांनी महाबळेश्वर कडून उरणकडे जाणाऱ्या



खाजगी प्रवाशी बसला अडवून वाहन चालकाकडे गाडीच्या पेपरची मागणी केली. सर्व कागदपत्र योग्य असल्यामुळे अखेर सदर वाहतूक पोलीसांनी २०० रुपयांच्या चिरीमिरीची मागणी केली. अखेर १०० रुपयांवर तोडगा निघाला. चिरीमिरी देऊन ड्रायव्हर बस घेऊन पुढे खारपाडा कडे रवाना झाला, मात्र २०० न दिल्याचा पोलिसांनी राग धरून गाडीचा मागून फोटो मारून ५०० रुपयांचे सिग्नल वायोलेशन हे चलन फाडले. या चलनाचा मेसेज गाडी मालक राजा अण्णा खारघर यांच्या मोबाइलवर रात्रीच्या दरम्यान आला. त्यानुसार मालकांनी वाहनचालकाला घडला प्रकार विचारत गाडी परत पाठीमागे फिरवून चौकीत आणायला सांगितली. त्यानुसार चालकाने याबाबत वाहतूक पोलिसांना विचारले असता पोलिस मिलिंद पाटील यांनी अरेरावी करण्यास सुरुवात केली. मात्र त्याच दरम्यान बस मालक राजा अण्णा हे रायगड बस मालक युनियन अध्यक्ष समीर माखिजा, अमित गावंड, संदीप म्हसकर व इतर सदस्य यांना घेऊन ते रात्रीच्या दरम्यान पेण–रामवाडी चौकीवर धडकले असता त्यांनी व्हिडीओ रेकॉर्डिंग करत या दोन्ही वाहतूक पोलिसांची चांगलीच कानउघडणी केली. त्यानंतर आपली चुक लक्षात येता सदर वाहतूक पोलिस मिलिंद पाटील आणि पांडू पाटील यांनी बस मालक, चालक, युनियनचे अध्यक्ष, तसेच प्रवाशी वर्गांची माफी मागितली.

मात्र संपूर्ण प्रकरणाचे व्हिडीओ शूटिंग सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने व सदर तक्रार वरिष्ठांकडे झाल्याने चिरीमिरीखोर वाहतूक पोलिस मिलिंद पाटील आणि पांडू पाटील यांची म्हसळा पोलिस ठाण्यात तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. सदर दोन्ही वाहतूक पोलिसांना तात्काळ निलंबित करत रायगड जिल्ह्यातील पोलिसांचे रात्रीस खेळ चाले बंद करावे अशी मागणी सर्वसामान्य पेणकर करीत आहेत.

# उरणमध्ये आधारकार्ड रेशनकार्डला जोडण्याचा त्रास

## अल्पवयीन मुलांना रेशनकार्ड व ई-सेवा केंद्रावर पहाटेपासून लहान मुलांच्या रांगा



**दै.रायगड नगरी । उरण**

आधारकार्ड अपडेट करण्याचा विनाकारण त्रास लहान आणि अल्पवयीन मुलांना सहन करावा लागत आहे. रेशनकार्ड आधारकार्डसोबत लिंक करण्याचे आदेश आल्यानंतर शिधापत्रिका दुकानदारांनी रेशनकार्ड आधारकार्डशी लिंक करण्यास सुरूवात केली. मात्र लहान मुलांचे ठसे रेशनकार्ड लिंक करताना जूळत नसल्याने आधारकार्ड अपडेट करण्यासाठी लहान मुलांच्या व पालकांच्या रांगा ई–सेवा केंद्रावर पहाटेपासूनच लागू लागल्या आहेत. थंडीत कुडकुडत ही लहानमुले आधारकार्ड अपडेट करण्यासाठी ई–सेवा केंद्राबाहेर रांगा लावून उभी असतात. प्रशासनाने याची गंभीर दखल घेवून काहीतरी उपाययोजना कराव्यात अशी मागणी पालकांकडून करण्यात येत आहे.

अल्प उत्पन्न धारक लोकांना रेशनिंगवर स्वस्त आणि मोफत धान्य मिळतेय म्हणून सधन लोकांनी सुद्धा रेशनकार्ड आधारकार्डशी लिंक करून या योजनांचा पुरेपुर फायदा घेतला. सरकारच्या ही गोष्ट लक्षात आल्यानंतर आधारकार्ड परत एकदा आधारकार्डशी लिंक करण्यास सांगितल्यानंतर लिंक करण्यासाठी लोकांच्या लांबच लांब रांगा रेशनिंग दुकानासमोर लागल्या. याचा त्रास मात्र विनाकारण अल्पवयीन मुलांना होवू लागला आहे.

अल्पवयीन मुलांचे पाच वर्षानंतर आधारकार्ड अपडेट करणे गरजेचे असते. मात्र अनेक पालकांनी आपल्या मुलांचे आधारकार्ड अपडेट केलेले नसल्यामुळे त्यांचे अंगठे रेशनकार्ड लिंक करताना जुळत नव्हते.

त्यामुळे आधारकार्ड लिंक करण्यासाठी या अल्पवयीन मुलांची आणि त्यांच्या पालकांची रांग ई–सेवाकेंद्रा बाहेर लागू लागल्या. ई–सेवा केंद्रात एका दिवशी फक्त ४० जणांचे आधारकार्ड अपडेट होत असल्याने या लहान मुलांना आणि पालकांना शाळा बुडवून थंडीत कुडकुडत पहाटेपासून ई–सेवा केंद्रावर नंबर लावण्यासाठी रांगेत उभे रहावे लागत आहे. मागील अनेक दिवसांपासून हा प्रकार सुरू असून त्याचा त्रास या अल्पवयीन कोवळ्या मुलांना सहन करावा लागत आहे. थंडीत कुडकुडत तासनतास रांगेत उभे राहताना या चिमुकल्यांचा मात्र जीव मेटाकुटीला येत आहे. तर काही मुलांना शाळा बुडवून आधारकार्ड अपडेट करण्यासाठी यावे लागत आहे.

नरेश पेडवी ( नायब तहसिलदार, पुरवठा विभाग )– सरकारने ३१ डिसेंबर २०२१पर्यंत आधारकार्डसोबत रेशन कार्ड लिंक करण्यास सांगितले आहे. अल्पवयीन मुलांचे आधारकार्ड दर पाच वर्षानी अपडेट करणे गरजेचे असते मात्र अनेकांनी आधारकार्ड अपडेट केले नसल्यामुळे रेशनकार्ड लिंक होत नाही. त्यामुळे ई–सेवा केंद्राबाहेर गर्दी होते. मात्र याचा त्रास जर अल्पवयीन आणि लहान मुलांना होत असेल तर ई–सेवा केंद्र चालकांना आणि रेशन दुकानदारांना उपाययोजना करण्यास सांगितले जाईल.

# संक्षिप्त...

## विधानसभेत ’शक्ती विधेयक’ एकमताने मंजूर



**दै.रायगड नगरी । मुंबई**

महिलांवरील अत्याचारा विरोधात तातडीने कठोर शिक्षा करण्यासाठी तयार करण्यात आलेले शक्ती विधेयक आज विधानसभेत एकमताने मंजूर झाले. या विधेयकामुळे पीडित महिलांना खऱ्या अर्थाने नवी शक्ती मिळाली आहे.

गेल्यावर्षी तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी अनेक तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन शक्ती कायदा विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर केला होता. यावेळी विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानंतर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त चिकित्सा समितीने अभ्यास करून नव्याने तयार केलेले शक्ती विधेयक आज विधानसभेत एकमताने मंजूर झाले. विरोधकांकडूनही या शक्ती विधेयकाचे स्वागत करण्यात आले आहे. हे विधेयक आता मंजुरीसाठी विधानपरिषदेत मांडले जाणार आहे. दोन्ही सभागृहातील मंजुरीनंतर ते राज्यपाल आणि राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी पाठवण्यात येईल.

दरम्यान, राज्यात महिला आणि बालकांवरील अत्याचाराच्या घटनांना आळा बसवा, यासाठी तयार करण्यात आलेल्या शक्ती विधेयक सुधारणा करण्यासाठी संयुक्ती समितीची स्थापना करण्यात आली होती. त्या समितीकडून अभ्यास आणि तज्ज्ञांचे मत जाणून घेत योग्य त्या सुधारणा करण्यात आल्या. विशेष म्हणजे या शिक्षेच्या कक्षेत पुरुषांबरोबरच महिला आणि तृतीयपंथी यांनाही आणले गेले आहे.

# शेकापच्या शेकडो पदाधिकाऱ्यांनी केला शिवसेनेत जाहीर प्रवेश



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना पक्ष प्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे व युवसेना प्रमुख तथा राज्याचे पर्यावरण पर्यटन व राज्यशीष्टाचार मंत्री आदित्य ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर प्रेरित होऊन व शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली तसेच युवसेना सचिव वरुण सरदेसाई यांच्या प्रमुख उपस्थित व त्यांच्या हस्ते नितळस येथील शेतकरी कामगार पक्षाचे ग्रामपंचायत सदस्य व माजी उपसरपंच सुनील काठे, ग्रामपंचायत सदस्य अशोक पाटील, रविंद्र काठे व शेकडो कार्यकर्त्यांनी हाती शिवबंधन बांधून शिवसेना पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला.

त्याप्रसंगी शिवसेना तालुका संघटक भरत पाटील, विधानसभा संघटक दिपक निकम तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, यतीन देशमुख, रामदास गोंधळी, उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, विधानसभा अधिकारी पराग मोहिते, परशुराम भोपी, एकनाथ काठे, शिवसैनिक सिद्धेश गुरव आदि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कामोठेचा पाणी प्रश्न पालिका सभागृहात ; प्रीतम म्हात्रे यांनी लक्षवेधीद्वारे वेधले सभागृहाचे लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीमध्ये भेडसावत असलेल्या पाणीप्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी सोमवारी (ता. २०) आयोजित महासभेत केला आहे. वसाहतीमधील नागरिकांना स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी देण्यासाठी पालिकेतर्फे टँकरद्वारे पाणी पुरवण्यात यावे, अशी मागणी या वेळी विरोधी पक्षनेत्यांनी केली आहे.



पनवेल महानगर पालिकेच्या सर्वसाधारण सभेत विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी कामोठे वसाहतीत सिडकोद्वारे होणारा पाणीपुरवठा अत्यंत दूषित व जंतूयुक्त असल्याचे सभागृहात सांगितले. वसाहतीतील तीन कुटुंबातील लहान मुले आजारी पडल्याचे यावेळी त्यांनी सभागृहात मांडले. कामोठे येथे होणाऱ्या दूषित पाणीपुरवठामुळे अनेक नागरिकांचे आरोग्य धोक्यात असल्याचे सांगत सदर विषयावर तात्काळ कार्यवाही करून पाणी प्रश्न सोडवावा व तातडीने कामोठे वसा–हतीत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था करण्याची मागणी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यानी सभागृहापुढे केली. कामोठे वसाहतीमधील अनेक भागांत काही दिवसांत दूषित पाणीपुरवठा केला जात आहे. सिडकोद्वारे वसाहतीला केल्या जात असलेल्या पाणी पुरवठ्यात जंतू आढळून येत असल्याने नागरिकांना विकतचे पाणी घेऊन तहान भागवावी लागत आहे. विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी सभागृहाचे लक्ष कामोठेमधील पाणीप्रश्नाकडे वेधण्याचा प्रयत्न केला. सिडको तसेच पालिकेच्या माध्यमातून वसाहतीमधील रहिवासी संस्थांना स्वच्छ पाणी पुरवण्यात यावा, अशी मागणी या वेळी केली. विरोधी पक्षनेते पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी उपस्थित केलेल्या विषयावर बोलताना पालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी वसाहतीला स्वच्छ पाणी मिळावे, यासाठी जलवाहिन्या दुरुस्ती करून सिडकोकडे पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. गरज भासल्यास पालिकेद्वारे वसाहतीला पाणीपुरवठा करण्यात येईल, असे आश्वासन सभागृहाला दिले आहे.

# वंचितांनी पुढे येऊन शासनाच्या योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा : विजय तळेकर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सामाजिक व विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्य पुरस्कृत योजना व केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य इत्यादी योजनांबाबत पनवेलचे तहसिलदार विजय तळेकर यांच्य अध्यक्षतेखाली पनवेल तहसिलदार कार्यालय येथे बुधवारी (दि. २२ डिसेंबर) दुपारी ४ वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती.



सदर बैठकीमध्ये संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावण बाळ सेवाराज्य निवृत्तीवेतन योजना, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कार्यालयात प्राप्त झालेली एकूण ६६ प्रकरणे मंजूरीकरिता ठेवण्यात आली होती. याबाबत पात्र/अपात्र झालेल्या प्रकरणांची माहिती तहसीलदार विजय तळेकर यांनी दिली. त्यानुसार संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत ५४ प्रकरणे पात्र झाली असून एकही प्रकरण अपात्र झाले नाही. तर पात्र प्रकरणातील अनुदान रक्कम ५८२००/– रुपये इतकी आहे. त्याचप्रमाणे श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत ४ प्रकरणे पात्र ठरली असून एकही प्रकरण अपात्र ठरले नाही. तर पात्र प्रकरणातील अनुदान रक्कम ४०००/– रुपये इतकी आहे. तसेच केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेअंतर्गत ८ प्रकरणे पात्र ठरली असून एकही प्रकरण अपात्र ठरलेले नाही. तर पात्र प्रकरणातील अनुदान रक्कम १६००००/– रुपये इतकी आहे. याप्रमाणे एकूण ६६ प्रकरणे मंजूर झाली असून पात्र प्रकरणातील अनुदान रक्कम २,२२,२००/– रुपये इतकी मंजूर झाली आहे.

पनवेल तालुक्यात राज्य पुरस्कृत योजना व केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत एकूण ४९२० प्रकरणे मंजूर असून त्यात बुधवारी तहसीलदार कार्यालयात झालेल्या बैठकीमध्ये एकूण ६६ प्रकरणे नवीन मंजूर झाल्याने एकूण लाभार्थी संख्या ४९८६ झा–लेली आहे. पनवेल तहसीलदार कार्यालयात दर महिन्याला बैठकीचे आयोजन केले जात असून त्या बैठकीत प्रकरणे मंजूर केली जातात. यासाठी एजंट शिवाय थेट लोकांनी येणे गरजेचे आहे.

संजय गांधी योजनेअंतर्गत अनाथ, …/२

> या योजनेअंतर्गत आतापर्यंत जेवढे लाभार्थी मंजूर झालेले आहेत, त्याव्यतिरिक्त अजूनही लाभार्थी आ-हेत. मात्र ते अद्याप समोर आलेले नाहीत. यासाठी समाजातील जेष्ठ नागरिक, समाजसेवक यांनी पुढाकार घेऊन जास्तीत जास्त प्रकरणे प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्यावी, असे आवाहन सर्व नागरिकांना करण्यात येत आहे.
>
> **- विजय तळेकर, तहसीलदार पनवेल**

# इंदापूर नजिक चारित्र्याच्या संशयावरून पत्नीची हत्या

**दै.रायगड नगरी । माणगाव**

चारित्र्याच्या संशयावरून पत्नीची निर्घृण हत्या केल्याची घटना माणगांव तालुक्यात घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार सविस्तर वृत्त असे की, माणगांव तालुक्यात दि. २२ डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वा. च्या पूर्वी मौजे मुठवली तर्फे तळे आदिवासीवाडी येथील फिर्यादी गोविंद महादेव धाडवे यांच्या राहत्या घरी आरोपी पांडुरंग सत्या हिलम, वय ४५ वर्ष, राहणार मुठवली (निजामपूर तर्फे) आदिवासीवाडी, ता. माणगांव याने त्याची पत्नी लिला पांडुरंग हिलम, वय ३३ वर्ष हिच्या चारित्र्याच्या संशयावरून लाथाबुक्क्यानी, कोयत्याने, कुऱ्हाडीने मारहाण करून जीवे ठार मारले. या गुन्ह्याची नोंद माणगांव पोलीस ठाण्यात कॉ. गु. र. नं. २६६/२०२१ भा. दं. वि. सं. क. ३०२ प्रमाणे करण्यात आली असून पुढील तपास माणगांव पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अश्वनाथ खेडकर करीत आहेत.

# शिवाची विविध रूपे असलेली एलिफंटा लेणी भाविकांसाठी सोमवारी खुली ठेवा

## खा. श्रीरंग बारणे यांची केंद्रीय पर्यटन मंत्र्यांकडे मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

मावळ लोकसभा मतदारसंघातील उरण घारापुरी बेटावरील महादेवाची विविध रूपे अस–लेली अतिप्राचीन लेणी पुरातत्त्व विभागाकडून दुरुस्ती, देखभालीसाठी आठवड्याच्या प्रत्येक सोमवारी बंद ठेवली जाते. सोमवार हा भगवान शिवाची उपासना करण्याचा सर्वात शुभ दिवस मानला जातो. नेमके त्याचदिवशी मंदिर बंद ठेवले जात असल्याने हजारो देशी–विदेशी पर्यटक, भाविकांना शिवदर्शनाला मुकावे लागत आहे. त्यामुळे शिवभक्तांमध्ये तीव्र असंतोष आहे. त्यासाठी मंदिर सोमवारी उघडे ठेवावे. सोमवार



सोडून इतर कोणत्याही दिवशी देखभालीसाठी बंद ठेवावे, अशी मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केली.

याबाबत केंद्रीय सांस्कृतिक, पर्यटन मंत्री जी. किशन रेड्डी यांची भेट …/२

# महात्मा फुले महाविद्यालयामध्ये टॅली प्रशिक्षण व मार्दर्शन शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रयत शिक्षण संस्थेच्या ध्येय धोरणानुसार संस्थेतील प्रत्येक सेवकाने आधुनिक तंत्रज्ञान अवगत करून त्याचा योग्य वापर प्रशासना मध्ये केला पाहिजे. आज आपणासर्वांस अपेक्षित परिवर्तनाची गरज आहे त्यासाठी सर्वांनी बदलत्या परिस्थितीनुसार स्वतःला बदलले पाहिजे तरच आपली व देशाची प्रगती होऊ शकते कारण परिवर्तन हि काळाची गरज आहे असे मत लोकनेते माजी रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पनवेल येथे आयोजित टॅली प्रशिक्षण व मार्दर्शन शिबीरामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले. या शिबिराचे आयोजन महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, व रयत शिक्षण संस्था रायगड विभाग कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार बाळाराम पाटील होते. त्यांनी या उपक्रमाची उपयुक्तता स्पष्ट करीत असे उपक्रम संस्थे मध्ये वारंवार घेणे आवश्यक आहे. संस्थेतील कर्माचा-यांना टॅली सारखे प्रशिक्षण दिले तर ऑडीटच्या कामामध्ये पारदर्शकता व ऑडीट मध्ये येणा-या अडचणी व दिरंगाई यावर मात करता येऊ शकते. यासाठी संस्थेतील सेवक माहिती व तंत्रज्ञानामध्ये सक्षम असला पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी थोडक्यात प्रास्ताविक करीत प्रशिक्षणाच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. अत्याधुनिक तंत्रज्ञान येऊ घातले असताना संस्थेतील सेवक हा प्रशिक्षित झाला पाहिजे यासठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. असे सांगितले. या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे ऑडीटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य एम.बी. शेख, शहाजी डोंगरे ओ एस डी रयत शिक्षण संस्था सातारा, एस एस फडतरे विभागीय सहाय्यक अधिकारी आर.पी ठाकूर विभागीय अधिकारी, तसेच रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागातील विविध शाखांमधील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्रीवर्धन घनकचरा प्रकल्पात आढळला नाळसदृश्य पदार्थ

## नाळसदृश्य पदार्थ उघड्यावर टाकणाऱ्यावर कारवाई करण्याची होतेय मागणी

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात एक नाळसदृश्य पदार्थ सापडल्याने शहरात खळबळ उडाली आहे. प्रकल्पातील कर्मचारी नाळसदृश्य पदार्थ एक खड्डा खणून त्यात पुरुन टाकण्याचा प्रयत्न केला होता.

श्रीवर्धन शहरात फिरणाऱ्या घंटागाडीमध्ये हा पदार्थ टाकला असून घंटागाडीतून तो घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात आला असल्याचं सांगितलं जातं आहे. कोणीतरी अज्ञात इसमाने नवजात अर्भक टाकल्याबाबतची अफवा श्रीवर्धन मध्ये फिरत होती. याबाबत माहिती कळताच नगरपालिका प्रशासनाने श्रीवर्धन पोलीस ठाण्यात याबाबत माहिती दिली. पोलिसांनी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाला भेट देऊन खड्यात पुरलेलं नाळसदृश्य पदार्थ काढून पंचनामा करून उपजिल्हारुग्णालय श्रीवर्धन येथे पदार्थ तपासासाठी घेऊन गेले. वैद्यकिय अधिकारी यांनी नाभीसंबधीचा दोर असलेली मानवी नाळ असल्याची खात्री करून दिली. त्यानंतर त्याची विल्हेवाट लावण्यासाठी नगरपालिका प्रशासनाकडे जबाबदारी देण्यात आली. याबाबत श्रीवर्धनचे प्रथमनागरिक नगराध्यक्ष फैसल हुर्जुक यांना विचारणा केली असतां त्यांना कोणतीही कल्पना पालिका प्रशासनाने दिली नसल्याची प्रक्रिया दिली.

सदर बाब अतिशय गंभीर असून यापूर्वी देखील अश्याप्रकारे गुरांचे पाय घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात आढळले होते. त्याप्रकारणामुळे जातीय तेड व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. असे प्रकार घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात वारंवार घडत आहेत. सदर प्रकरणात नाळसदृश्य पदार्थ घंटागाडीत टाकणाऱ्या व्यक्तीचा शोध घेऊन त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी शहरातून केली जात आहे. नाळसदृश्य पदार्थ एका दवाखान्याच्या पिशवीत मिळाल्यामुळे व त्याच्या बरोबर औषधांचे पॅकेट असल्यामुळे हा प्रकार शहरातील दवाखान्याशी निगडित असल्याचा संशय वर्तवला जात आहे. त्यामुळे ही नाळ सदृश्य पदार्थ दवाखान्यातून टाकण्यात आला असल्यास पोलीस प्रशासनाने त्याचा तपास लावून संबंधित डॉक्टर वर कारवाई करण्याची देखील मागणी केली जात आहे.

# २८ लाख ५० हजार रुपये किंमतीच्या मास्कची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा एमआयडीसीतील व्हिनस सेफ्टी ऍन्ड हेल्थ प्रा.लि. कंपनीतील कामगार व सुरक्षारक्षकांनी कंपनीच्या गोडाऊनमधील तब्बल २८ लाख ५० हजार रुपये किंमतीचे ३० हजार एन-९५ मास्कची चोरी करुन त्यांची बाहेर परस्पर विक्री केल्याचा प्रकार उघडकिस आला आहे. तळोजा पोलिसांनी या चोरी प्रकरणातील कामगार व सुरक्षारक्षकांसह तीघांविरोधात गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

तळोजा एमआयडीसीतील व्हिनस सेफ्टी ऍन्ड हेल्थ प्रा.लि. या कंपनीत मास्क, गॉगल, एअरफ्लग इत्यादी वैयक्तीक सुरक्षा उपकरणे तयार केली जातात. कंपनीकडून तयार करण्यात आलेला माल कंपनीतील गोडाऊनमध्ये ठेवला जाऊन सदर मालाची आवक जावक नोंद केली जाते. सदर गोडाऊनमध्ये ठेवण्यात आलेल्या सुरक्षारक्षकाकडून गोडाऊनमधुन बाहेर जाणाऱ्या तयार मालाची नोंद केली जाते. सदर कंपनीच्या गोडाऊन मधील कामगारांनी तेथील सुरक्षारक्षकांच्या मदतीने गोडाऊन मधून बाहेर जाणाऱ्या मालाच्या बॉक्समध्ये जास्त बॉक्स टेम्पोत भरुन सदरचा माल बाहेर विकला. दरम्यान, कंपनीतील प्रमुख उत्पादक अधिकारी महेंद्र घाग व इतर अधिकाऱ्यांनी गोडाऊन मधील तयार मालाची तपासणी केली असता, तेथील मालामध्ये तफावत असल्याचे आढळुन आले. त्यामुळे अधिकाऱ्यांनी गोडाऊन मधील सुरक्षा रक्षकाजवळ असलेले रजिस्टर व मुख्य गेटवरील आवक-जावक रजिस्टरची तपासणी केली असता, त्यात देखील मोठ्या प्रमाणात तफावत असल्याचे आढळुन आले. त्यामुळे अधिकाऱ्यांनी स्टोअर मधील कामगार संतोष खंदारे याला विश्वासात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता, त्याने गोडाऊन मधील सुरक्षारक्षक व इतर कामगारांच्या मदतीने गोडाऊन मधून बाहेर जाणाऱ्या मालाच्या बॉक्समध्ये जास्त बॉक्स टेम्पोत भरुन ते बाहेर विकल्याचे सांगितले. त्यानंतर कंपनीतील अधिकाऱ्यांनी स्टॉक लेजर, सीसीटीव्ही कॅमेरे व तयार मालाच्या बिलांची तपासणी केली असता, कंपनीतील कामगारांनी मागील तीन ते चार महिन्यामध्ये कंपनीच्या गोडाऊनमधील तब्बल २८ लाख ५० हजार रुपये किंमतीचे ३० हजार एन-९५ मास्कची चोरी केल्याचे आढळुन आले. त्यानुसार कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी मास्कची चोरी करणारा कामगार संतोष खंदारे सह सुरक्षारक्षक व इतर कामगारांविरोधात गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे. अद्याप या प्रकरणात कुणालाही अटक करण्यात आली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको संपादित भूखंडावर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ क्षेत्रात येणाऱ्या संबंधित अनधिकृत बांधकामधारकांना महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम १९६६ चे कलम ५३ (१) (अ) अन्वये नोटीस बजावण्यास प्रत्यक्ष ठिकाणी गेले असता, अनधिकृत बांधकामधारकांनी नोटीस घेण्यास/चिकटवण्यास विरोध दर्शविल्याने संबंधित नोटीस या जाहीर सूचनेद्वारे प्रसिद्धीस देण्यात येत आहे.

| अ.क्र. | MRTP नोटीस क्रमांक | बांधकामधारकाचे नाव/पत्ता | इमारत क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | P-११२६८ २३/११/२०२१ | श्री. रघुबाई भाई गोंधळी, शैला रंजित मढवी, मु. चिंचपाडा, पो. वडघर, ता. पनवेल, जि. रायगड | इमारत क्रमांक-CHIM-ICIG-०७, बांधकाम क्रमांक M-१२१, M-१२२ |
| २. | P-११२६९ २३/११/२०२१ | श्री. दर्शन भाई गोंधळी, मु. चिंचपाडा, पो. वडघर, ता.पनवेल, जि. रायगड | इमारत क्रमांक-CHIM-ICIG-२१, बांधकाम क्रमांक M-१७७ |

महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम १९६६ च्या कलम क्र. ५३ (१) (अ) अन्वये २४ तासांच्या आत आपण, ते अनधिकृत बांधकाम करण्यापूर्वी जमीन ज्या स्थितीत होती, त्या स्थितीत आणून ठेवण्याचे मी आपणांस आदेश देतो. मी तुम्हाला अशी नोटीस देतो की, आपण २४ तासांच्या आत वर दर्शविल्याप्रमाणे अनधिकृत बांधकामाची दखल घेतली नाही तर, वर उल्लेखलेल्या कायद्याखाली मला असलेल्या अधिकारांचा वापर करुन मी सदर अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्याची कारवाई करण्यात येईल.

या प्रकरणी करण्यात आलेला खर्च हा तुमच्याकडून जमीन महसूलाच्या बाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

या सूचनेद्वारे सूचित करण्यात येत आहे की, सदर अनधिकृत बांधकामे सिडको महामंडळ कायदेशीर प्रक्रिया अवलंबून निष्कासित करीत आहे. त्यामुळे सदरहू बांधकामे स्वत:हून काढून टाकावीत अन्यथा होणाऱ्या नुकसानीस सिडको महामंडळ जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**नियंत्रक अनधिकृत बांधकामे (दक्षिण)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३६३/२०२१-२२


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.जयेश इन्फ्रास्ट्रक्चर ॲण्ड प्रोजेक्टस प्रायव्हेट लि. ऑफिस पत्ता : एफ-८९, भूखंड क्र.४७, फँटासिया बिजनेस पार्क, सेक्टर ३०, वाशी, नवी मुंबई यांनी खालील वर्णनाचा भूखंड १) श्री.श्याम कान्हा ठाकूर, २) श्री.अरुण कान्हा ठाकूर, ३) श्री.भारत कान्हा ठाकूर, ४) श्रीमती.यमुना गणपत पाटील, ५) श्रीमती.गंगाबाई रामचंद्र घरत, ६) श्रीमती.भिमाबाई रघुनाथ पाटील, ७) श्रीमती.अरुणा अरुण फडके, ८) श्रीमती.सुरेखा रमेश कडू, ९) श्रीमती.आशा रामचंद्र उलवेकर सर्व जण रा.पोस्ट : उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांचेकडून सदर भूखंड त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करून देत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**संचिका क्र.६८६**

| नोड | भूखंड क्र. | क्षेत्र | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| उलवे | २५६ ए | १७ | २४९.०२ |

तरी याबाबत कोणाही व्यक्ती / व्यक्तीचे किंवा आर्थिक संस्थाचे भूखंड संदर्भात तसेच कुठल्याही प्रकारचे प्रलंबित दावे मे.न्यायालयीन तसेच उच्च व कनिष्ठ न्यायालयीन दावे, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी, निमसरकारी, कंपनी, बक्षिस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत कागदपत्रांसोबत खालील पत्यावर समक्ष भेटावे.

दि.२३/१२/२०२१

**सही/-**
**ॲड.सौ.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, प्रभात सेंटर,**
**सीबीडी बेलापूर**
**मो.नं.८३६९०१७३६३**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल साहिल जयधारा आर्किटेक्टस् तर्फे मालक श्री.साहिल अशोक जयधारा यांनी नोड-द्रोणागिरी, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या भूखंडामधील श्री.महेश दामोदर पाटील यांचे भाडेपट्टा तथा सर्व हक्क हितसंबंधासहीत सदर भूखंड योग्य त्या कराराने हस्तांतरीत करून घेण्याचे ठरविले आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| प्लॉट नं. | सेक्टर | क्षेत्र (चौ.मी.) | नोड |
|---|---|---|---|
| ४७ | १५ | ९९.९८ | द्रोणागिरी |

सदर जाहीर नोटीसीद्वारे सर्व व्यक्ती / लोकांस कळविण्यात येत आहे की, सदर भूखंडास अनुसरुन कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न-वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे कसलाही हक्कहितसंबंध असल्यास सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरुपासहीत प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात. सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर भूखंडाचा हस्तांतरण करार / भूखंड विक्री करार कायदेशीरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक : २३/१२/२०२१
ठिकाण : पनवेल

**सही/-**
**ॲड.शरद जाधव**
**तळमजला, रॉयल प्राईड बिल्डींग,**
**भूखंड क्र.११३, मिडल क्लास को.**
**ऑप.हौ.सोसायटी, पनवेल-४१०२०६,**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९८२०६३७१७५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आम्ही मौजे : वेश्वी, ता.उरण, जि.रायगड येथील खाली नमूद केलेली मिळकत अनंत लहू गोंधळी यांजकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| वेश्वी, ता.उरण, जि.रायगड | २५/४ | ०-०५-८० | १.१९ |

तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आम्ही सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करू व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.२३/१२/२०२१

**सही/-**
**कनू एम.ठक्कर**
**७, राधा निवास, ७ राजावाडी रोड,**
**घाटकोपर (पू), मुंबई-४०००७७**
**मो.नं.९३२२५५१४१४**

मे.पांडे साहेब कोर्ट
अर्जदार तर्फे वकील : ॲड.सौ.रश्मी बाळाराम जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रि.चौ.अर्ज क्र.१३६९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२५/०१/२०२२

सौ.शेवंती जगन्नाथ वाघमारे
वय : ७० वर्षे, धंदा : शेती
रा.देवद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत चिखले,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई कै.भिमा शंकर पाटील यांचा मृत्यू दि.२५/०७/१९६७ रोजी मु.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झाला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने, मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत चिखले कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील चौकशी अर्ज अर्जदार यांनी मयत कै.भिमा शंकर पाटील यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता दाखल केला आहे.

सबब, सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास, सदरची हरकत, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.कोर्टात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२३/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल |
|---|---|---|

मे.पांडे साहेब कोर्ट
अर्जदार तर्फे वकील : ॲड.सौ.रश्मी बाळाराम जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
क्रि.चौ.अर्ज क्र.१३७०/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२५/०१/२०२२

सौ.शेवंती जगन्नाथ वाघमारे
वय : ७० वर्षे, धंदा : शेती
रा.देवद, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत चिखले,
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील कै.शंकर बगाराम पाटील यांचा मृत्यू दि.०१/०६/१९८५ रोजी मु.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झाला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने, मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत चिखले कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील चौकशी अर्ज अर्जदार यांनी मयत कै.शंकर बगाराम पाटील यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता दाखल केला आहे.

सबब, सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास, सदरची हरकत, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.कोर्टात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२३/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल |
|---|---|---|

मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदारातर्फे वकील
ॲड.स्वानंद भा. नवाळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८१८/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.२७/०१/२०२२

श्रीमती.हेमलता उमेश खरसंबळे वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड व मौजे : मानखुर्द येथील मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**अ) मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड, येथील प्रथमेश पारस को.हौसिंग सोसायटी लि., सदनिका क्र.३०२, तिसरा मजला, प्लॉट नं.११५, एकूण क्षेत्र ४३२ चौ.फूट, ४०.१३ चौ.मी. (बिल्टअप एरिया १३ चौ.फूट म्हणजेच १.२० चौ.मी.)**

**ब) मौजे : मानखुर्द, भारत नगर, मुंबई, खोली नं.एम.जी.-१/९० २/२, क्षेत्र १८×१०**

कै.उमेश पांडुरंग खरसंबळे हे दि.१८/०४/२०२१ रोजी मयत पावले असून, त्यांना अर्जदार क्र.१) श्रीमती.हेमलता उमेश खरसंबळे, २) कुमारी भाग्यश्री उमेश खरसंबळे, ३) कुमारी ऋतुजा उमेश खरसंबळे, ४) कुमार वेदांग उमेश खरसंबळे व ५) कुमारी वेदांती उमेश खरसंबळे, सबब अर्जदार हेच कै.उमेश पांडुरंग खरसंबळे यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी कै.उमेश पांडुरंग खरसंबळे, यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालयात योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.७/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

राव साहेब
ॲड.मानस मोहंती व
ॲड.योगिनी भराडे मोहंती
अर्जदार यांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.१९४७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०२/२०२२

१) श्रीमती.विनया महादेव लाड
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.प्रशांत महादेव लाड
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.राकेश महादेव लाड
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
वरील सर्व रा.फ्लॅट नं.४०५, बिल्डींग नं.७, ए विंग,
मानसरोवर कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१,२,४ ते ६, १९ ते २६,
सेक्टर नं.३४, कामोठे, नवी मुंबई-४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
निरंक — सामनेवाला

वरील अर्जदार १ यांचे पती व २ आणि ३ यांचे वडील कै.श्री.महादेव रावजी लाड यांचे दि.१३/०३/२०२० रोजी रामनाथ हॉस्पिटल, रत्नागिरी येथे निधन झाले. यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मालमत्तेचे वर्णन**

**फ्लॅट नं.४०५, बिल्डींग नं.७, ए विंग, मानसरोवर कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.१,२,४ ते ६, १९ ते २६, सेक्टर नं.३४, कामोठे, नवी मुंबई-४१०२०६. तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र, क्षेत्रफळ ३१५ चौ.फूट. कारपेट एरिया.**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२३/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

पृष्ठ क्र.१ वरुन...

# वंचितांनी पुढे येऊन शासनाच्या योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा

वयोवृद्ध, विधवा, निराधार, घटस्फोटित तसेच कॅन्सर, एचआयव्ही सारख्या दुर्धर आजारांनी ग्रस्त, अपंगांना लाभ घेता येतो. परंतु यासाठी उत्पनाचेही व इतर काही निकष आखून दिलेले आहेत. यामध्ये दारिद्र्य रेषा उत्पन्न आणि कमवता मुलगा नसावा, या गोष्टींचे काही निकष पाळले गेल्यास समाजामध्ये या योजनेपासून वंचित असलेले असंख्य लाभार्थी सापडतील. त्यामुळे या योजनेचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी पुढे येऊन माहिती द्यावी असे आवाहन तहसीलदार विजय तळेकर यांनी केले आहे.

# शिवाची विविध रूपे असलेली एलिफंटा लेणी भाविकांसाठी सोमवारी खुली ठेवा

घेऊन निवेदन दिले. त्यात खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, घारापुरी बेटावर कलचुरी घराण्याच्या कारकिर्दीत कोरण्यात आलेली अतिप्राचीन कोरीव लेणी आहेत. काळ्या पाषाणात योगेश्वर शिव, रावणानुग्रहमूर्ती, शिवपार्वती, अर्धनारीनटेश्वर, गंगावतरण शिव, शिवपार्वती विवाह, अंधकारसुरवधमूर्ती, नटराज शिव आणि महेशमूर्ती अशी शिवाची विविध रूपे या कोरीव शिल्पात अद्भुतरीत्या कोरलेली आहेत. कोरीव शिल्पांबरोबरच लेणी परिसरातील विविध गाभा-यांत अतिप्राचीन चार शिवलिंग आहेत. त्यापैकी लेणींच्या पश्चिमेलाही पूर्वाभिमुख शिवमंदिर सुमारे २० चौ. मी. छतापर्यंत भिडलेले आहे. शिवमंदिराला चारही दिशांना दारे आहेत.

या चारही दारांवर विशाल द्वारपाल तैनात आहेत. मंदिरात चौकोनी शाळुंका असून, अगदी तिच्या मधोमध विशाल लेणींचे मुख्य आकर्षण आहे. अशी ही शिवाची अद्भुत शिल्पे पाहण्यासाठी देश-विदेशी पर्यटकांची वर्षभर नेहमीच गर्दी असते. हजारो भाविक शिवाची पूजा करण्यासाठी येतात. मात्र, वर्ल्ड हेरिटेजचा दर्जा लाभलेल्या घारापुरी लेणी प्रत्येक सोमवारी देखभालीच्या कारणासाठी बंद ठेवली जाते. मागील आठ-दहा वर्षांपासून घारापुरीचे सरपंच बळीराम ठाकुर यांनी ग्रामपंचायतीच्या वतीने सोमवारी मंदिर उघडण्याची मागणी केली जात आहे. सोमवार हा भगवान शिवाची उपासना करण्याचा सर्वात शुभ दिवस मानला जातो. त्यासाठी भारतीय पुरातत्व विभागाला मंदिर सोमवारी उघडे ठेवण्याच्या सूचना द्याव्यात. जेणेकरून यात्रेकरूंना सर्वात शुभ दिवशी त्यांची प्रार्थना करता येईल. सोमवार सोडून इतर कोणत्याही दिवशी देखभालीसाठी बंद ठेवावे, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वसंतराव ओसवाल यंदा वाढदिवस साजरा करणार नाहीत

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोरोना सारख्या जागतिक महामारी च्या संकटाने सामाजिक , सार्वजनिक जनजीवन अस्तव्यस्त झाले. अनेकांनी आपले जिवलग नातेवाईक गमावले. अशा परिस्थितीत सामाजिक बांधिलकीचे भान जपत शासनाने घालून दिलेल्या कोरोना नियमांचे उल्लंघन होऊ नये या कारणास्तव राष्ट्रवादी कॉंग्रेस चे माजी जिल्हाध्यक्ष व सुधागड एजुकेशन सोसायटीचे अध्यक्ष वसंतराव ओसवाल हे २५ डिसेंबर रोजी असणारा वाढदिवस साजरा करणार नाहीत अशी माहिती रायगड राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला अध्यक्षा गीता पालरेचा यांनी दिली.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून सलग तीन वेळा रायगड जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्ष पदाची धुरा समर्थपणे सांभाळणारे , इतर मागास वर्गीय व वित्त विकास महामंडळाचे अध्यक्ष पद भूषविणारे व रायगड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात नामांकित असणाऱ्या सुधागड एज्युकेशन सोसायटीचे विद्यमान अध्यक्ष वसंत गणेशमल ओसवाल यांचा दरवर्षी २५ डिसेंबरला वाढदिवस मोठ्या धुमधडाक्यात पक्षाचे कार्यकर्ते, हितचिंतक व संस्थेचे कर्मचारी वर्ग पालीमध्ये साजरा करीत असतात. यावर्षी ते ८० व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. यावेळी जिल्हाभरातून मोठ्या संख्येने पक्षाचे कार्यकर्ते, हितचिंतक हे पालीत येऊन वसंत ओसवाल यांना दीर्घायुष्य व जीवनात आनंद मिळावा यासाठी हार्दिक शुभेच्छा देण्यासाठी येतात. परंतु यावर्षी जागतिक कोरोना महामारीचे संकटाचे सावट जगभर आहे. त्यासाठी शासनाने घालून दिलेल्या अटी पाळण्याची जबाबदारी हि आपल्या सर्वांची आहे. त्यामुळे वाढदिवस साजरा न करण्याचे निश्चित केले आहे असे गीताताई पालरेचा यांनी सांगितले.

# श्रीवर्धन येथे नूतन न्यायालयीन इमारत व न्यायाधीश निवासस्थाने बांधणीसाठी हिवाळी अधिवेशनात निधी मंजुर

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

विधी मंडळाच्या हिवाळी अधिवेशनात राज्य शासनाने सादर केलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन येथील न्यायालयाच्या इमारतीसाठी १ कोटी ४७ लाख ६६ हजार रुपये तर न्यायाधिशांच्या निवासस्थानाकरीता २० लाख रूपये अशी एकूण १ कोटी ६७ लाख ६६ हजार रूपयांचा निधी मंजूर करून घेण्यास श्रीवर्धनच्या आमदार तथा रायगड जिल्हा पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांना यश आले आहे.

श्रीवर्धन येथील दिवाणी न्यायालय इमारत व दोन न्यायाधिश निवासस्थाने बांधण्यासंदर्भात शासनाकडे ना. आदिती तटकरे यांनी सतत मागणी केली होती. सदर प्रस्तावास शासनाने मंजूरी देत याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला होता. जनतेच्या न्याय हक्कासाठी दर्जेदार सुविधांसह न्यायालयीन इमारत आवश्यक होती तसेच तेथील न्यायाधिशांसाठी निवासस्थानेही आवश्यक होती. त्यानुषंगाने न्यायालयाच्या अद्यावत इमारत व निवासस्थानाकरीता एकूण अंदाजित खर्चाच्या दहा टक्के निधी सुमारे १ कोटी ६७ लाख ६६ हजार रुपये सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात वितरित करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये सांस्कृतिक, ऐतिहासिक व नैसर्गिकरित्या पर्यटनाचा वारसा लाभलेला श्रीवर्धन तालुका हा लोकप्रिय आहे. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात पेशवेकालीन ऐतिहासिक घटनांसाठी श्रीवर्धन तालुक्याला मोठे महत्त्व आहे.

रमणीय वातावरण, स्वच्छ व निर्मळ समुद्र किनारे, दिवेआगर व हरिहरेश्वर ही धार्मिक ठिकाणे, वाढत्या दळणवळणाच्या सुविधांमुळे तालुक्याच्या लोकसंख्येत वाढ होत आहे. तालुक्यात सुलभ न्यायिक कामकाजाच्या दृष्टीने येथील सुसज्ज न्यायालयीन इमारत व न्यायाधीश निवासस्थाने आवश्यक बाबींसह नव्याने उभारण्यासाठी पालकमंत्री कु. ना. आदिती तटकरे यांनी विशेष प्रयत्न केले.

नूतन न्यायालयीन इमारत ही दुमजली असून त्यामध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंग, अपंगांसाठी उतरण, फर्निचर, पाणीपुरवठा व मलनि:स्सारण, विद्युतीकरण, अग्निशमन यंत्रणा, कंपाऊड वॉल, अंतर्गत रस्ते, पार्किंग, वातानुकुलित यंत्रणा, उद्वाहन, सीसीटीव्ही, बाग-बगीचा या सुविधांसह उभारण्यात येणार असून त्यासाठी सुमारे १४ कोटी ७६ लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे.

याशिवाय न्यायाधीशांच्या नूतन निवासस्थानांच्या उभारणीसाठीही २ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

# नवी मुंबई डाक विभागामार्फत सुकन्यांना ‘समद्धी’ चे दान

**दै.रायगड नगरी । पनवेल**



नवी मुंबई डाक विभाग हा नेहमी त्यांच्या नावीन्यपूर्ण आणि समाजपयोगी उपक्रमासाठी ओळखला जातो. महाराष्ट्र डाक सर्कलच्या चिफ पोस्ट मास्टर जनरल श्रीमती विणा आर. श्रीनिवास यांच्या पनवेल भेटीच्या अनुषंगाने असाच उपक्रम पनवेल हेड पोस्ट ऑफीस येथे राबविण्यात आला.

स्त्री भ्रूणहत्या टाळण्यासाठी तसेच मुलीच्या उच्चशिक्षणाच्या व लग्नाच्या खर्चासाठी बचत करता यावी यासाठी भारत सरकारने २०१४ साली 'सुकन्या समद्धी योजना' सुरू केली. या योजनेत अत्यंत आकर्षक व्याजदर आणि पालकांना आयकर सवलत उपलब्ध आहे. समाजातील वंचित घटकातील मुलींना या योजनेत सामावून घेण्यासाठी डाक विभाग नेहमी प्रयत्नशील असतो. नवी मुंबई डाक विभागामार्फत पनवेल शहरातील शिवनगर तसेच मागास भागातील मधील शंभर मुलींची सुकन्या समद्धी खाती पनवेल हेड पोस्ट ऑफीस येथे उघडण्यात आली. विशेष म्हणजे या मुलींच्या पालकांकडून प्रारंभीची जमा रक्कम न घेता डाक कर्मचा-यांनी स्वेच्छेने स्वतः चे योगदान देऊन खाती उघडली. महाराष्ट्र डाक सर्कलच्या चिफ पोस्ट मास्टर जनरल श्रीमती विणा आर. श्रीनिवास यांच्या शुभहस्ते सुकन्या समृद्धी पासबुकांचे व भेटवस्तूंचे वितरण मुलींना करण्यात आले. तसेच या प्रसंगी प्रमुख पाहूण्यांच्या हस्ते वृक्षारोपण समारोह पनवेल हेड पोस्ट ऑफीसच्या प्रांगणात पार पडला. या प्रसंगी नवी मुंबई रीजनचे पोस्ट मास्टर जनरल श्री गणेश सावळेश्वरकर, डायरेक्टर ऑफ पोस्टल सर्विसेस श्रीमती शरण्या यु, नवी मुंबई डाक विभागाचे वरीष्ठ अधीक्षक डॉ. अभिजीत इचके, पालकवर्ग आणि टपाल विभागातील कर्मचारी उपस्थीत होते.

# विद्यार्थी रमले गणितीय क्रियांमध्ये ; नेणवली शाळेत गणितोत्सव उत्साहात

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

आंतरराष्ट्रीय गणित दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासन पंचायत समिती पाली व नेणवली शाळा यांच्यामार्फत २० ते २२ डिसेंबर या कालावधीत गणितोत्सवाचे आयोजन राजीप शाळा नेणवली येथे करण्यात आले होते. यामध्ये इयत्ता पहिली ते चौथी व पाचवी ते सातवी अंतर्गत विद्यार्थ्यांच्या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

भारत सरकार द्वारे निपुण भारत या अभियानांतर्गत संख्याज्ञान व पायाभूत साक्षरता हा उद्देश ठेवून या गणित उत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात गणिती परिपाठ अंतर्गत गणिती बडबडगीते, गाणी गणिती गोष्ट त्याचबरोबर गणितीय रांगोळी, गणिती चित्रकला स्पर्धा फलकलेखन, गणितावर आधारित प्रश्नमंजुषा, गणित कोडी व कूटप्रश्न तसेच गणितपेटी साहित्य व विद्यार्थ्यांनी केलेल्या गणिती साहित्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले. या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक संतोष हरपाल, उपशिक्षक राजेंद्र अंबिके व गणपत वरगडे यांनी संपूर्ण नियोजन व व्यवस्थापन केले.



# राष्ट्रीय गणित दिन विविध प्रकारच्या कार्यक्रमानी संपन्न



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**


रोहे तालुक्यातील श्रमिक विद्यालय चिल्हे येथे निपूण भारत अभियान अंतर्गत राष्ट्रीय गणित दिनानिमित्त विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करून गणित दिन मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक दीपक जगताप, नरेंद्र माळी, राजेश म्हात्रे, शिवनाथ दराडे, अमोघ सुरवसे, संजय आंधळे, महेंद्र जवरत, सुनील थिटे, पांडुरंग शिद, अमित डाके, अनुराधा मोरे, ज्योत्स्ना सबरदंडे, प्रविण मरवडे, रामदास नवघरे, चंद्रशेखर कांबळे, रेश्मा शिंदे आदी उपस्थित होते.

या गणित दिनानिमित्त ता.२० रोजी रांगोळी स्पर्धा, २१ रोजी प्रश्नमंजुषा स्पर्धा तर २२ डिसें. रोजी आगळ्या वेगळ्या पद्धतीने गणित जत्रा भरवून या तिन्ही दिवसांची अधिक रंगत वाढविली. तिन्ही दिवसांच्या या उपक्रम व स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले तसेच सहभागी विद्यार्थ्यांनाही पारितोषिके देण्यात आली.

# तरुणीचे अपहरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**



एका अल्पवयीन मुलीचे अपहरण झाल्याची घटना नावडे परिसरात घडली आहे.

अशोक झा यांची १७ वर्षीय मुलगी रंग गोरा, उंची अंदाजे ५ फुट ५ इंच, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, डोळे काळे, नाक सरळ केस काळे व लांब असून अंगात फिक्कट रंगा कुडता व फिक्कट खाकी रंगाचा पायजमा तसेच पायात लाल रंगाची सॅण्डल असून तिला हिंदी व मराठी भाषा अगवत आहे. तसेच तिच्या उजव्या हाताच्या अंगठ्याच्या बाजूच्या बोटावर तीळ आहे. तिचे अपहरण नावडे येथील महाविद्यालय परिसरातून करण्यात आले आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात देण्यात आली असून याबाबत अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र कोंडे भ्रमणध्वनी ९४२२५९४५३९ येथे करावा.


राव साहेब

ॲड.रेखा होवाळे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या न्यायालयात

चौ.अर्ज क्र.१९५९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०२/२०२२

१) श्रीमती.मालती गजानन घरत
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.विलास गजानन घरत
वय : ४४ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) कु.मनिषा गजानन घरत
वय : ४२ वर्षे, धंदा : काही नाही
४) श्री.देवेंद्र गजानन घरत
वय : ४१ वर्षे, धंदा : व्यवसाय
सर्वजण रा.घर नं.५३४, मु.बेलपाडा, सेक्टर ३,
खारघर, ता.पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार

ज्यापेक्षा मयत श्री.गजानन महादेव घरत हे दि.१७/०५/२०२१ रोजी बेलपाडा खारघर येथे झाला आहे. अर्जदार नं.१ ही पत्नी आहे आणि अर्जदार नं.२ ते ४ ही मुले आहेत. यांनी त्यांचे खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

**मालमत्तेची अनुसूची ‘अ’**
**मालमत्ता धारकाचे नाव : श्री.गजानन महादेव घरत**
**घर नं.५३४, मु.बेलपाडा, सेक्टर ३, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**
**क्षेत्रफळ : २२७९ चौ.मी.पैकी अंदाजे मुल्य रु.३,६०,०००/-**
**(फक्त तीन लाख साठ हजार मात्र)**

खालील मिळकतीबाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकत कळवावी आणि या लेखी नोटीसीवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास त्यांचेबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

तारीख २३/१२/२०२१

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



Adv.Sudhir S. Mhatre
Adv.Kalyani S. Patil-Mhatre

**PUBLIC NOTICE**

In The Court of Hon'ble District Judge, At Panvel
Dist-Raigad
Spl. Divorce Petition No.46.2021
Ex.no.8/D
Next date : 29.01.2022

MR.JITENDRA PAL SINGH SUCHA SINGH PADDA
Age 30 Years, Occupation-Service,
Residing At- D-504, Hari Heritage,
Plot No.17A/18/19/20, Sector-22,
Kamothe, Panvel, Raigad-410206 Petitioner No.1
AND
MRS.AMANDEEP KAUR JITENDRA PAL SINGH PADDA
BEFORE MARRIAGE NAME
AMANDEEP KAUR SURJEET SINGH DHILLO.
Age 27 Years, Occupation-
Residing at - Near Samaj Mandir Hall,
8A/2714/171,Tagore Near, Vikhroli (E),
Mumbai, Maharashtra PetitionerNo.2

Whereas the above-named petitioners have mutually filed the petition for mutual consent divorce under The Special Marriage Act 1954.as the petitioners herein realized that their likings, tastes of life, temperaments, ideas, ideologies, thing etc. Are different. This made them impossible to live together as husband and wife hence this petition is filed.

The said petition is filed without collusion or connivance with each other. The petitioners is making this public proclamation to wave of the cooling off period of six months as permitted by law. You the member of public are hereby given notice to appears before in the court of district judge -2 and Addi. Sessions Judge Panvel,Dist. Raigad. In person or by pleader duly instructed to file your say/objections if any within 30 days from the date of publication of this public Notice, falling which this petition will be held presumption presuming that there is no objection from anybody for granting the mutual consent divorce petition will be finally decided.

Given under my hand and seal on this day of 22 nd dec.2021

Sd/- Jr.Clerk District Court Panvel — Court Seal — Sd/- Assi.supdt/Registrar District Court Panvel



मा.मुजावर सो.कोर्ट

ॲड.अमेय वि. चांदोरकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१८०२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३१/०१/२०२२

१) सौ.प्राची मंदार देवधर
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.लोखंडीपाडा, ए-१०३, श्री सहयोग सोसा.,
अमरधाम रोड, पनवेल, रायगड-४१०२०६
२) सौ.प्रिया योगेश राय
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.विघ्नहर्ता अपार्टमेंट, प्लॉट नं.बि-०२,
पळस्पे, पनवेल, रायगड-४१०२२१
सध्या रा.मु.पो.पळस्पे, ओएनजीसी कॉम्प्लेक्स,
पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२२१
३) श्रीमती.संध्या दिलीप ओझे
वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.पो.पळस्पे, ओएनजीसी कॉम्प्लेक्स,
पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१० — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी मयत कै.दिलीप आनंद ओझे यांचा मृत्यू दि.०१/०३/२०१८ रोजी राहत्या घरी म्हणजेच घर क्रमांक १८४, ब्राह्मण आळी, पळस्पे, पनवेल रायगड-४१०२२१ येथे झाला असून त्यांच्या पश्चात त्यांचे कायदेशीर वारस मुलगी सौ.प्राची मंदार देवधर, मुलगी सौ.प्रिया योगेश राय व पत्नी श्रीमती. संध्या दिलीप ओझे हे आहेत. मृत्यूसमयी मयत कै.दिलीप आनंद ओझे यांचे नावे व मालकी कब्जात खालील वर्णनाच्या मिळकती होत्या.

**घर क्रमांक १८४, ब्राह्मण आळी, पळस्पे, पनवेल, रायगड-४१०२२१, क्षेत्रफळ सुमारे ५०७० चौ.फूट जमिनीसह त्यावरील ११२० चौ.फूट क्षेत्रफळ असलेले घर**

वर वर्णन केलेल्या मिळकतींच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणेकामी अर्जदार यांनी मे.न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

सबब, सदरच्या वारसदाखला मिळावा म्हणून केलेल्या अर्जाचे कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत स्वतः अथवा वकीलांमार्फत मे.न्यायालयात सादर कराव्यात. सदर नोटीसीच्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व अर्जदार यांना दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास ह्या अर्जदारांचे लाभात वारस दाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.२२/१२/२०२१ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.मुजावर साहेब कोर्ट

ॲड.मानस मोहंती व
ॲड.योगिनी भराडे मोहंती
अर्जदार यांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.१९३६/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०३/०२/२०२२

१) श्रीमती.कल्याणी यशवंत शेलार
वय : ७२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.८०/डी, कुर्ला नगर, एस.जी.बर्वे रोड,
कुर्ला (ईस्ट), मुंबई, महाराष्ट्र-४०००२४
२) श्री.अजितसिंग जयवंत विश्वासराव
वय : ७० वर्षे, धंदा : रिटायर्ड
रा.३६७, नियर राम मंदिर, राम वाडी, कोसुम्ब,
रत्नागिरी, महाराष्ट्र-४१५८०४
३) श्रीमती.अनघा अरुण साळवी
वय : ६८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.बी-१०२, चित्रकुंज सोसायटी, नियर साई बाबा मंदिर,
कल्याण रोड, ठाकुर्ली, ठाणे, महाराष्ट्र-४२१२०१
४) श्रीमती.शलाका सुशील सावंत
वय : ६६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.११०१, गणेश सिद्धी (२), सीएचएसएल,
प्लॉट नं.२९०, राम मंदिर रोड, बोरीवली (वेस्ट),
मुंबई-४०००९१
५) श्रीमती.हेमलता जयवंत विश्वासराव
वय : ६४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.७२, आर.के.बिल्डींग २, रामभाऊ भोगले मार्ग,
काळाचौकी, मुंबई, महाराष्ट्र-४०००३३
६) श्रीमती.सुनिता सदानंद शेलार
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.सी/१५, सहारा सीएचएसएल, संत ज्ञानेश्वर मार्ग,
सावरकर नगर, बोरिवली (ईस्ट), मुंबई, महाराष्ट्र-४०००६६
७) श्रीमती.आशा जयवंत विश्वासराव
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.७, गंगाधर सीएचएसएल, जी.डी.आंबेडकर मार्ग,
बिहाइंड हाफकिन इन्स्टिट्यूट, परेल,
मुंबई, महाराष्ट्र-४०००१२ — अर्जदार
विरुद्ध
निरंक — सामनेवाला

वरील सर्व अर्जदार, यांची आई कै.श्रीमती.सुमित्रा जयवंत विश्वासराव यांचे दि.२६/०३/२०१५ रोजी ७, गंगाधर सीएचएसएल, आंबेडकर नगर, परेल टँक रोड, परेल, मुंबई-४०००१२ येथे निधन झाले. यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

**५०% हिस्सा फ्लॅट नं.ए/३०२, तिसरा मजला, ए विंग, स्पेस रेसिडेन्सी, प्लॉट नं.६५, सेक्टर नं.३५, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र, क्षेत्रफळ ७०.३५ चौ.मी. कारपेट एरिया**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



Godse Judge

Advocate Bilal A Chougule

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF 3RD JOINT CIVIL JUDGE
SENIOR DIVISION AT PANVEL
CIVIL M.A. NO. 808 OF 2021
Exh No: 7/D
Next Date : 10/01/2022

Mr.Suhel Mannan Niyazi
Age: 43 years, Residing al: A/302,
Saurabh CHS, Vaswani Marg,
Behind Avinash Tower, 7 Bunglow
Azad Nagar, Andheri (West), Mumbai - 400053.
... Petitioner
V/S
1. Mrs. Afroz Mannan Niyazi
Age: 70 years, Residing at: A/302.
Saurabh CHS, Vaswani Marg,
Behind Avinash Tower, 7 Bungalow.
Azad Nagar, Andheri (West). Mumbai - 400053.
2. Mrs. Zaiba Tarannum Intekhab Shaikh
Age. 41 years. Residing at :17-A,
Rahim Seth Chawl, Atlas Wala Building.
1st Floor, Room No. 14, 2nd Ghelabai
Street, Madanpura, Mumbai - 400008.
3. Mr. Faisal Mannan Niyazi
Age: 37 years. Residing at: A/302,
Saurabh CHS, Vaswani Marg,
Behind Avinash Tower. 7 Bungalow,
Azad Nagar, Andheri (West), Mumbai-400053.
4. Mr. Rahel Mannan Niyazi
Age: 37 years, Residing at: A/302,
Saurabh CHS; Vaswani Marg,
Behind Avinash Tower, 7 Bungalow,
Azad Nagar, Andheri (West),
Mumbai -400053 ...Defendants

Whereas the General Public are hereby informed through this Notice that the Applicant had filed this Civil M.A. No. 808 of 2021 before the Hon'ble 3rd Joint Civil Judge for getting the Legal Heirship Certificate in respect of the Immovable Property being Shop No. 003, Ground Floor, Building known as Green Woods, Plot No. 179, Sector 30, Kharghar left by the Deceased Mr. Mannan Mubarak Hussain Niyazi who died intestate on 1st February, 2019 at Kokilaben Dhirubhai Ambani Hospital, Mumbai.

Hence the General Public Is hereby Informed through this Notice that if any one has objection if the Applicant Mr Suhel Mannan Niyazi is declared as Legal Heirs of deceased Mr Mannan Mubarak Hussain Niyazi then that person should give their written objection within 30 days from the date of the receipt of this Notice through their Advocate and in case there is no objection from any person then the Hon'ble 3rd Joint Civil Judge (Senior Division), Panvel will declare Applicant as the Legal Heir of Mr. Mannan Mubarak Hussain Niyazi.

**SCHEDULE OP THE PROPERTY**
**Shop No. 003, Ground Floor,**
**Building known as Green Woods,**
**Plot No.179, Sector 30, Kharghar,**
**District: Raigad, Pin Code : 410210.**

This Public Notice is signed and sealed by Hon'ble 3rd Joint Civil Judge (Senior Division), Panvel on this 22 day of December, 2021.

Sd/- Jr.Clerk Civil Court (Senior Division), Panvel — Court Seal — Sd/- Assi.supdt Civil Court (Senior Division), Panvel

# संक्षिप्त...

## कोलेटी येथे राष्ट्रवादी चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील कोलेटी येथे १३ ते १६ जानेवारी, २०२२२ या दरम्यान झोतिरपाडा मतदार संघ राष्ट्रवादी चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन जय हनुमान क्रिडा मंडळ कोलेटी यांच्या वतीने करण्यात आले आहे. या क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन आमदार अनिकेतभाई तटकरे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहा तालुका उपाध्यक्ष अनिल डाकी यांनी दिली आहे.

या क्रिकेट स्पर्धे संदर्भात अधिक माहिती देताना अनिल डाकी यांनी सांगितले की, या स्पर्धेतील प्रथम क्रमांकास २५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकास १५ हजार रुपये, तर तृतिय व चतूर्थ क्रमांकास प्रत्येकी ७ हजार रुपये पारितोषिक व आकर्षक चषक दिले जाणार आहेत.

## खोपटे येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

स्वराज्य ग्रुप खोपटे –उरण व आर झूनझूनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने श्री गणेश मंदिर खोपटे सभागृह (उरण )येथे मोफत नेत्र तप–ासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर मोठ्या उत्साहात उत्तम प्रतिसादासह संपन्न झाले. यावेळी स्वराज्य ग्रुप खोपटेचे अध्यक्ष प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष हेमंत ठाकूर, ग्रूप ग्राम पंचायत बांधपाडा खोपटे सरपंच विशाखा प्रशांत ठाकूर, आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलचे प्रकाश पाटील, ग्रामस्थ मंडळ खोपटेचे अध्यक्ष विश्वनाथ पाटील, कामगार नेते रवी घरत, भाजपा तालुकाध्यक्ष रवि भोईर, ग्रामस्थ मंडळाचे सचिव कुमार ठाकूर, विष्णू पाटील, ग्रामपंचायत बांधपाडाचे सदस्य, प्रशांत भाऊ मित्र परिवार,स्वराज्य ग्रुपचे पदाधिकारी सदस्य, ग्रामस्थ मंडळ खोपटेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. या शिबिराला जनतेचा उत्तम प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते सुनील वर्तक यांनी केले.



# तळा नगरपंचायत निवडणूक ओबीसी आरक्षण अनारक्षित करून सर्वसाधारण प्रवर्गातून आरक्षण जाहीर

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायतीची चार जागांसाठी सुधारीत आरक्षणाची सोडत गुरुवार दि.२३ रोजी काढण्यात आली. यामध्ये दोन जागा या सर्वसाधारण महिलांसाठी राखीव आहेत तर दोन जागा या सर्वसाधारण म्हणून जाहीर करण्यात आल्या आहेत.

तळा नगरपंचायतीची मुदत गतवर्षीच संपली असून राज्य निवडणूक आयोगाने आरक्षणाची सुधारित सोडत काढण्याचा कार्यक्रम जाहीर केला होता.त्यानुसार रायगड जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार तळा नगरपंचायत सदस्यपदाची चार जागांसाठी सुधारित आरक्षण सोडत डॉ.नानासाहेब धर्माधिकारी सभागृह पंचायत समिती तळा येथे पेण उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार, तहसीलदार आण्णापा कनशेट्टी, मुख्याधिकारी माधुरी मडके यांचे नियंत्रणाखाली काढण्यात आली आहे. सुधारीत आरक्षण सोडतीत प्रभाग क्रमांक



१(पुसाटी, वडाची वाडी) सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र.३ (बामणघर, बौद्धवाडी, गौळवाडी) सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र.१० (सोनार आळी, फोंडळ आळी) सर्वसाधारण, प्रभाग क्र.१४ (मेट मोहल्ला फोंडळ वाडी) सर्वसाधारण अशी आरक्षणे पडली आहेत. नव्याने काढण्यात आलेल्या या आरक्षण सोडतीत महिलांना संधी देण्यात आली असून या चार जागांसाठी १८ जानेवारी रोजी मतदान पार पडणार आहे.

संकेतस्थळावर भरण्यात आलेले उमेदवारी अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी स्वीकारण्याचा कालावधी – २९ डिसेंबर ते ३ जानेवारी २०२२, अर्ज छाननी – ४ जानेवारी, वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे – ४ जानेवारी, अर्जाचा स्वीकार करण्याबाबत किंवा ते नामंजूर करण्याबाबतचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरूध्द जिल्हा न्यायाधिशांकडे अपिल करण्याची शेवटची तारीख – ७ जानेवारी, जिल्हा न्यायाधिशांनी अपिलावर सुनावणी व निकाल – १० जानेवारी, अपिल निकालात काढल्यावर वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे – १० जानेवारी, उमेदवारी मागे घेणे (जिथे अपिल नाही) – १० जानेवारी, जिथे अपिल आहे तिथे – १२ जानेवारी निवडणूका लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व चिन्ह वाटप जिथे अपिल नाही – १० जानेवारी, जिथे अपिल आहे – १२ जानेवारी मतदानाची तारीख – १८ जानेवारी मतमोजणी तारीख (दि. २१ डिसेंबर रोजी मतदान झालेल्या जागांसह सर्व जागांची) – १९ जानेवारी असा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे

# पनवेल महानगरपालिका पनवेल स्वच्छता स्पर्धा २०२२ जाहीर आवाहन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये स्वच्छता विषयक जास्तीत जास्त माहिती, शिक्षण प्रसार,व जनजागृती करण्याच्या उद्देशाने या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या अंतर्गत टाकाऊतून टिकाऊ, स्वच्छ गृहनिर्माण संस्था/शाळा/रूग्णालये/'शासकीय कार्यालये/बाजारपेठा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल यांनी यावेळी केले.



स्वच्छ भारत मिशन अंतर्गत पनवेल महानगरपालिकेमार्फत 'पनवेल स्वच्छता स्पर्धांचे' आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांवर चर्चा करण्यासाठी आज महापौर दालनात महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, मा.उपमहापौर जगदीश गायकवाड, स्थायी समिती सभापती संतोष शेट्टी, चारही प्रभाग समितीचे सभापती, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, प्रभाग समिती अधिकारी यांच्या उपस्थितत ही बैठक घेण्यात आली.

स्वच्छ भारत सर्वेक्षणमध्ये स्वच्छतेबाबतचे मानांकानात वाढ व्हावी यासाठी या सर्व नागरिकांनी स्पर्धेत सहभागी होणे गरजेचे आहे. पालिका क्षेत्रातील रहिवाशांना कचरा वर्गीकरण, तसेच प्रक्रिया स्वच्छता विषयक उपक्रम राबविण्यास प्रोत्साहन देणे तसेच यामध्ये सातत्य् ठेवून रहिवाशांच्या सवीयीमध्ये बदल घडविण्याच्या दृष्टीने शहरातील गृहनिर्माण संस्था/शाळा/ रूग्णालये/'शासकीय कार्यालये/बाजारपेठा यांनी या मोठ्या संख्येने या स्वच्छता स्पर्धेत सहभाग घ्यावा. पालिका क्षेत्राचा स्वच्छतेचा दर्जा वाढवा यासाठी मोठ्या संख्येने नागरिकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे. असे आवाहन सभागृह नेते परेश ठाकूर यांनी यावेळी केले. ही स्पर्धा येत्या २५ डिसेंबर पासून सूरू होणार असून नागरिकांना यामध्ये १० जानेवारी २०२२ पर्यत नाव नोंदणी करता येणार आहे.

प्रभाग समिती कार्यालय, महापालिका मुख्यालयातील घनकचरा आणि आरोग्य विभागात नागरीकांनी नाव नोंदणी करावी. येत्या २६ जानेवारीला या स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम व प्रशस्ती पत्रक, मानचिन्ह असे बक्षीस देण्यात येणार आहे.

## महाराजस्व अभियानांतर्गत आज पोलादपूर शहरात विविध उपक्रम

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील जनतेसाठी विविध शासकीय कामकाजासंदर्भात महाराजस्व अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती नायब तहसिलदार शरदकुमार आडमुठे यांनी दिली.

रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर व महाड उपविभागीय अधिकारी महाड प्रतिमा पुदलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालय पोलादपूर तर्फे आझादी का अमृत महोत्सव व महाराजस्व अभियाना अंतर्गत बाळासाहेब ठाकरे सभागृह पोलादपूर येथे शुक्रवार दिनांक २४ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ११ ते ३ वाजता तहसील विभागाच्या विविध सेवा देण्याकरिता एक दिवसीय मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या मेळाव्यात विविध दाखले, रेशन कार्ड संबंधित कामे, संजय गांधी योजना संबधित कामे, मतदार यादीत नाव कमी करणे – वाढवणे, आधार नोंदणी ई. कामे तात्काळ करून देण्यात येणार आहेत.

तरी पोलादपूर तालुक्यातील सर्व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसील कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# को.ए.सो. व्हि.के. हायस्कूल पनवेल येथे राष्ट्रीय गणित दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

२२ डिसेंबर हा दिवस महान भारतीय गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा जन्म दिवस सर्वत्र मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. तसेच हा दिवस राष्ट्रीय गणित दिन म्हणून ही साजरा करण्यात येतो.

या दिनाचे औचित्य साधून पनवेल येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या विठोबा खंडाप्पा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद ठाकूर होते , तसेच कार्यक्रमास ज्येष्ठ शिक्षक ए.बी. पाटील,सुविद्या वावेकर ही उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राधिका ठाकूर यांनी थोर गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा अल्पपरिचय करून दिला. तसेच गणित या विषयाचे महत्त्व विशद केले. त्यानंतर



शशिकला जाधव यांनी गणित विषयावरील शैक्षणिक साहित्यांची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली.

कु.शिवप्रसाद साखरे या विद्यार्थ्यांने गणिताचे दैनंदिन जीवनातील स्थान या विषयावर आपले मनोगत थोडक्यात व्यक्त केले तसेच कु.झहीर शेख या विद्यार्थ्याने गणितीय कोडी सोडवण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक प्रमोद ठाकूर यांनी 'गणित सोडवताना सर्व पायऱ्या सोडवणे महत्त्वाचे असते आणि असे प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला निश्चितच यश मिळते'असे विचार मांडले. सदर कार्यक्रमाला ज्येष्ठ शिक्षिका सुविद्या वावेकर, राधिका ठाकूर, सुनिल हिरे, नरेंद्र जाधव, रामचंद्र पाटील, नयना पाटील, प्रीती ठाकूर सह सर्व शिक्षक उपस्थित होते. शेवटी स्मिता पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिती ठाकूर यांनी उत्तम प्रकारे पार पाडले.

# ओमायक्रॉनचा धोका लक्षात घेऊन पेण शहरांतील नागरिकांनी लसीकरण करावे : जीवन पाटील

**दै.रायगड नगरी । पेण**

ओमायक्रॉन विषाणूचा धोका लक्षात घेऊन संपूर्ण यंत्रणा सतर्क झाली. या विषाणूंचा धोका लक्षात घेऊन पेण शहरांतील नागरिकांनी लसीकरण करून घ्यावे असे आवाहन पेण नगरपालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी केले आहे. तर लस घेणाऱ्या नागरिकांना पेण नगरपरिषदे मार्फत कुपन देण्यात येणार आहे. येत्या ३० डिसेंबर रोजी नगरपरिषद सभागृहात होणां–या कार्यक्रमात लकी ड्रॉ काढला जाणार आहे.

पेण नगरपरिषदेच्या वतीने संपूर्ण पेण शहरात दवंडी देण्यात आली असून फवारणी करण्याचे काम होत आहे. जे नागरिक मास्क लावत नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत दि. २ डिसेंबर ते १५ डिसेंबर पर्यंत दंडात्मक कारवाई करून १२ हजार



५५० रुपयांची वसुली करण्यात आली आहे. लग्न कार्यामध्ये ५० टक्के उपस्थिती असावी असा आदेश काढण्यात आला आहे. याकडे विशेष लक्ष दिले जाईल असे सांगितले. तर ज्या नागरिकांनी पहिला डोस घेतला नाही त्यांनी तातडीने घ्यावा व दुसरा डोसही लवकर घ्यावा.

पेण शहरात २० डिसेंबर ते ३० डिसेंबर पर्यंत लसीकरण मोहीम सकाळी १० ते सायंकाळी ४ पर्यंत राबिवण्यात येणार असुन दि. २२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा पेण न.प. शाळा क्र. ४, दि.२३ गणपती मंदिर चावडी नाका, दि.२४ मरीआई माता मंदिर फणस डोंगरी, दि.२५ बुद्ध विहार बालवाडी शाळा, बुद्धनगर, दि.२७ हनुमान मंदिर कोळीवाडा, दि.२८ पेण न.प. शाळा क्र. ६ रामवाडी, दि.२९ पेण न.प. शाळा क्र. ७ महाडिक वाडी, दि.३० आगरी समाज हॉल , चिंचपाडा रोड आदी ठिकाणी मोहीम राबविण्यात येणार आहे. डोस घेणाऱ्या नागरिकांना नगरपरिषदे मार्फत कुपन देण्यात येणार आहे.

येत्या ३० डिसेंबर रोजी नगरपरिषद सभागृहात होणां–या कार्यक्रमात लकी ड्रॉ काढला जाणार आहे. त्यांतील विजेत्या नागरिकांना सदर कार्यक्रमात बक्षिसे दिली जाणार आहेत. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या लसीकरण मोहिमेत भाग घ्यावा असे आवाहन पेणचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी केले.

# आयुर्वेदीक सोप विकत घेण्याच्या बहाण्याने सायबर चोरट्यांनी महिलेला घातला १ लाख रुपयांना गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मिलीटरीमध्ये अधिकारी असल्याचे सांगुन दोघा सायबर चोरट्यांनी वैद्यक व्यवसाय करणाऱ्या कळंबोलीत एका महिलेकडून ऑर्गेनिक ३०० आयुर्वेदीक सोप विकत घेण्याचा बहाणा करुन सदर महिलेला ऑनलाईन रोख रक्कम पाठविण्याच्या बहाण्याने त्यांना क्युआर स्कॅन करण्यास भाग पाडून त्यांच्या खात्यातून सुमारे १ लाख रुपयांची रक्कम काढून घेतल्याचा प्रकार उघडकिस आला आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणातील दोघा सायबर चोरट्याविरोधात फसवणुकिसह आयटी ऍक्टनुसार गुन्हा दाखल करुन त्यांचा शोध सुरु केला आहे.

या घटनेत फसवणुक झालेली महिला वैद्यक व्यवसाय करत असून या महिलेचे कळंबोलीतील रोडपाली भागात क्लीनिक व पंचकर्म सेंटर आहे. सदर महिला सोशल मिडीया तसेच इंडीया मार्टच्या माध्यमातून ऑनलाईन कॉस्मेटीक्सचा हर्बल कल्चर नावाने व्यवसाय देखील करतात. मिलीटरीमध्ये अधिकारी असल्याचे सांगून करण सिंग नामक व्यक्तीने या महिलेच्या मोबाईलवर संपर्क साधला होता. तसेच त्यांच्याकडून ऑर्गेनिक ३०० आयुर्वेदिक सोप विकत घेण्याची तयारी त्याने दर्शविली. सदर सोपचे ३३ हजार ६८० रुपये होत असल्याचे सांगितल्यानंतर भामट्या करण सिंग याने त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यासोबत चर्चा करुन सोपची रक्कम पाठविण्याचे आश्वासन महिलेला दिले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी रोशन सिंग या भामट्याने मिलीटरी मध्ये वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवुन या महिलेसोबत संपर्क साधला. तसेच त्याने पैसे पाठविण्याच्या बहाण्याने त्यांना क्युआर कोड पाठवून ते स्कॅन करण्यास सांगितले.

त्यानुसार या महिलेने क्युआर कोड स्कॅन केला असता, त्यांच्या खात्यातून २३, ६८० व १० हजार रुपये गेले. त्यामुळे या महिलेने त्याला संपर्क साधल्यानंतर त्याने त्याच्या व्हॉट्सऍपवरुन त्याचे मिलीटरीचे ओळखपत्र व स्मार्ट कार्ड पाठविले. त्यानंतर त्याने या महिलेला पुन्हा कॉल करुन त्यांना बोलण्यात गुंतवून त्यांना आणखी तीन क्युआर कोड पाठवुन त्यांच्या खात्यातून आणखी ६६ हजाराची रक्कम काढुन घेतली.

सदर महिलेच्या खात्यातून सुमारे १ लाख रुपये गेल्यानंतर भामट्या रोशन सिंग याने पैसे परत हवे असतील तर त्यांना आणखी पैसे पाठवावे लागतील असे सांगितले. त्यानंतर आपली फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सदर महिलेने परिमंडळ–२च्या पोलीस उपआयुक्तांकडे लेखी तक्रार दाखल केली होती.

# पाली नगरपंचायत निवडणुकीच्या चार प्रभागांची आरक्षण सोडत जाहीर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

ओबीसी आरक्षण रद्द झाल्याने पाली नगरपंचायतच्या ४ प्रभागांसाठी नवीन आरक्षण सोडत गुरुवारी (ता.२३) येथील पाली तहसील कार्यालयात जाहीर झाली. यावेळी प्रभाग क्रमांक २ व १४ साठी सर्वसाधारण महिला आणि प्रभाग क्रमांक ५ आणि ८ साठी सर्वसाधारण खुला असे आरक्षण पडले आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा पालीत राजकीय वातावरण ढवळून निघणार आहे, पुन्हा रॅली प्रचारसभांना वेग



येणार आहे, त्यामुळे आता सर्वपक्षीय निवडणुकीला सामोरे जाण्यास सज्ज झाले आहेत.

येत्या १८ जानेवारीला ही निवडणूक होणार आहे. यासाठी नामनिर्देशन पत्र भरण्याची मुदत बुधवारी (ता.२९) ते सोमवार (ता.३) आहे. अशी माहिती सुधागड–पाली तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी दिली.

यावेळी प्रांताधिकारी डॉ. यशवंत माने, तहसीलदार दिलीप रायण्णावार, सीईओ अंगाई साळुंखे, जिप सदस्य सुरेश खैरे यांच्यासह सर्व पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

ओबीसी आरक्षण रद्द होण्याआधी या ४ जागांसाठी १९ नामनिर्देशन पत्र आली होती. मात्र आता या उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून लढण्यासाठी नव्याने नामनिर्देशन पत्र भरावी लागणार असल्याने या उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली.

# पुष्कर,राजस्थान येथे होणाऱ्या राष्ट्रीय दिव्यांग पॅरा कबड्डी स्पर्धेत मैदान गाजविणार

**दै.रायगड नगरी । तळा**

कुलाबा दिव्यांग क्रिडा असोसिएशन, महाराष्ट्र व सहकार्य (अपंग) दिव्यांग कल्याणकारी संस्था रायगड महाराष्ट्रचे महाराष्ट्र व मुंबई दिव्यांग पॅरा कब्बडी संघ २७–२९ डिसेंबर २०२१ रोजी पुष्कर मेला, अजमेर राजस्थान येथे होणाऱ्या राष्ट्रीय पॅरा कब्बडी राष्ट्रीय स्पर्धेसाठी रवाना होत आहे.

महाराष्ट्र व मुबई दिव्यांग पॅरा कब्बडी संघाकडून रायगड जिल्ह्यातील रमेश संकपाल (कर्णधार – महाराष्ट्र संघ)कर्जत रायगड, अक्षय निकम रोहा रायगड, मंगेश म्हात्रे(कर्णधार – मुंबई संघ) पेण रायगड, ओमकार महाडिक माणगाव रायगड, राजा मोकल पेण रायगड, मुकुल खाडे पेण रायगड हे खेळाडू व प्रशिक्षक व संघव्यवस्थापक म्हणून कुलाबा दिव्यांग क्रिडा असोसिएशनचे व सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रोहा रायगड, महाराष्ट्रचे सचिव शिवाजी पाटील, रमेश संकपाळ (कर्णधार – महाराष्ट्र संघ) मंगेश म्हात्रे(कर्णधार – मुंबई संघ) यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र व मुंबई दिव्यांग पॅरा कब्बडी संघ पुष्कर मेला, पुष्कर, जिल्हा अजमेर, राजस्थान येथे येथे मैदान गाजविण्यासाठी दिव्यांग बंधू नीलकंठ बडे, टाटा पॉवर चे निवृत्त कर्मचारी रमेश रोहिदास म्हात्रे यांच्या सहकार्याने आणि सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रायगड व कुलाबा दिव्यांग क्रिडा असोसिएशन चे सचिव शिवाजी पाटील व कुलाबा दिव्यांग क्रिडा असोसिएशनचे अध्यक्ष शशांक हिरवे व संकल्प अपंग संघचे सचिव बाबाराव धोत्रे यांच्या प्रयत्नाने रवाना होत आहे.